# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार – ब

वर्ष १, अंक १०१] शनिवार, डिसेंबर ५, २००९/अग्रहायण १४, शके १९३१ [पृष्ठे ४

किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक २२८


## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### ग्रामविकास व जलसंधारण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ डिसेंबर २००९

### अधिसूचना

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१.**

क्रमांक सेप्रनि. २००८/प्र.क्र. ८२/आस्था-९.—महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) कलम २७४, पोट-कलम (२) खंड (एकोणचाळीस) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनाला समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ मध्ये सुधारणा करण्यासाठी,

जे नियम उक्त कलम २७४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आले आहेत, पुढील नियम करीत आहे :---

१. या नियमांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) (दुसरी सुधारणा) नियम, २००९ असे संबोधण्यात येईल.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ मधील परिशिष्ट दोनमध्ये जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम पशुसंवर्धनशी) संबंधित नोंद-४, स्तंभ-३ मधील पशुधन पर्यवेक्षक पदासमोरील, स्तंभ-४ मधील :—

(अ) परिच्छेद (एक)(ब) मधील उपबंध (एक) आणि (दोन) करिता पुढीलप्रमाणे पर्याय समाविष्ट करण्यात येतील, जसे :—

" (एक) जिल्हा परिषदेच्या सेवेत आधिपासून नसल्यास ज्यांचे वय ३३ वर्षांपेक्षा अधिक नसेल असे उमेदवार ;

(दोन) जे माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर संचालकां-कडून किंवा कोणत्याही वैधानिक कृषि विद्यापीठांकडून घेण्यात येणाऱ्या पशुधन पर्यवेक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रमात उत्तीर्ण झाले असतील किंवा तांत्रिक परीक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून घेण्यात येणाऱ्या दुग्धशाळा क्षेत्र व्यवस्थापनातील दोन वर्षांचा पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण झाले असतील किंवा वैधानिक विद्यापीठामधील पशुवैद्यकीय शास्त्रातील पदवी धारण करीत असतील असे उमेदवार. "

(ब) परिच्छेद २ मधील शब्द व आकडे " ३ : १ असेल " ऐवजी शब्द व आकडे " १० : ९० असेल " असे समाविष्ट करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्रकाश हिर्लेकर,

शासनाचे सहसचिव.